मुद्या क्रं १० व ११ :- देवस्थान समिती कायदा १९७० च्या तरतूदीचे कायद्याची पुस्तके व बुकलेट :- देवस्थान समिती कायदा १९७० च्या तरतूदीच्या कायद्याची पुस्तीका असून दर वर्षी १०% वाढ करणेची तरतूद असतांना समितीने ४ वर्षातून एकदा १०% वाढ केलेची दिसून येते, हे योग्य नाही.कायद्याच्या तरतूदीचे पालन केलेचे दिसून येत नाही.

मुद्या क्रं १२ :- श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी देवीच्या चांदीच्या रथासाठी आवश्यक असले चांदी खरेदीबाबत :-

श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी देवीच्या चांदीच्या रथासाठी आवश्यक असले चांदी खरेदी बाबत मुंबई पब्लीक ट्रस्ट १९५० नुसार निविदा मागवणेसाठी शासनाची मान्यता घेतलेचे दिसून येत नाही.जून्या लाकडी रथास चांदीचा पत्रा देवून चांदीचा रथ बनविणेसाठी किती चांदी लागेल याचे अंदाजपत्रक केलेले नाही, व त्याचे मुल्यांकनही केलेचे दिसून येत नाही. या खर्चाबाबत समिती ठराव करून शासनाची पूर्व मान्यता घेतलेली नाही.चांदीचा रथ बनविणेसाठी प्रत्येक किलोमागे मजुरीचा दर कारागिराकडून किंवा प्रसिध्दी माध्यमातून माहीती घेवून निश्चीत केलेला नाही. मोघमपणे श्री साडविलकर या कारागिराने प्रती किलो १४००/- रु मजुरी दर दिला आहे,तो समितीने मंजूर केला आहे.त्यात कोणत्याही प्रकारची शासनाची मान्यता नाही. रथास बसविणेत येणा-या चांदीच्या पत्राची जाडी १८ गेज किंवा २२ गेज खरेदी करणेची चर्चा झाली.परंतू निश्चीत किती गेज पत्रा वापरावयाचा या बाबत समितीने ठराव केला नाही. गेजनुसार पृष्टभागाचे क्षेत्रफळास किती किलो चांदी लागणार या बाबतचे परिमाण निश्चीत केले नाही. परंतू २८३ किलो चांदी कोणत्या आधारे दिली याचाही उल्लेख केलेला नाही. चांदी आटवतांना व पाष्टा पाडतांना सदस्यांसमोर करणे आवश्यक होते,तसे काही केलेचे दिसून येत नाही. चांदी आटवल्यानंतर त्याची शुध्दता किती प्रमाणात आहे त्याचे प्रमाणपत्र चांदी हस्तातंरण करताना दिलेले नाही त्यामुळे शुध्दते बाबत खात्री करता येत नाही. चांदीचा पत्रा तयार करुन त्याचा मुलामा रथावर बसविताना तो किती गेजचा आहे व त्यात चांदीची किती शुध्दता आहे याचे प्रमाणपत्र दिलेले नाही. चांदीचा रथ तयार करणेसाठी पाच सदस्यांची समिती नेमली आहे. या सदस्यांनी केलेली चर्चा, सूचना आदेश याबाबतची नोंद चांदीचा रथ तयार करण्याच्या आदेशामध्ये नमुद नाही. रथासाठी किती चांदी वापरली ते काम झाले किंवा कसे? याबाबत कागदपत्र उपलब्ध झालेले नाहीत. श्री. साडविलकर यांचे मंजुरीचे पत्रक घेतलेले नाही. परंतु अग्रीम रूपये दोन लाख देणेत आले आहेत. सदरची बाब नियमबाहय असलेचे दिसून येते चांदी खरेदी बाबत हुंडीचा एक्स्पोर्ट अहमदाबाद येथुन २०.००१ इतकी चांदी खरेदी केली आहे. चांदी खरेदीवेळी निविदा घेतली नाही, चांदी शुध्दता प्रमाणपत्र नाही. पावती नंबर एचएस/२०६५/आर०३३, दि.२०/४/०९ नुसार खरेदी केलेचे दिसून येते परंतु त्यावर चांदी प्राप्त झालेचे चांदी घेणार यांची स्वाक्षरी नाही. वजन २०.०६७ चांदी खरेदी केली असून खरेदीदाराची चांदी जमा केलेची स्वाक्षरी नाही इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत. सदरची प्रक्रिया नियमबाहय दिसून येते.

मुददा क्र १३ :- आर्थिक व्यवहाराबाबत झालेले निर्णय:-

आर्थिक व्यवहाराबाबत शासनाने समितीला परवानगी दिलेले नसतांना समितीने शासनाचे पूर्व परवानगी शिवाय अनेक महत्वाचे निर्णय घेतले असून याबाबत कोणत्या आदेशाने व नियमाने निर्णय घेतले जातात याबाबत खुलासा केलेला नाही.

मुददा क्र १४ :- ठराव बुक :-

दिनांक १४/८/२००८ पासून पुढे पहाता सदर ठराव बुकामध्ये १ ते २४ ठराव नमूद आहेत.त्यानंतर भरत सुर्यवंशी सचिव,पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती,कोल्हापूर यांनी सदर प्रोसीडींग बुकाची तपासणी केली असता त्यावेळी दि.१२/९/२००९च्या सभेचा इतिवृतांत ठराव बुकामध्ये नोंद करणेत आला आहे. त्यानंतर १०/१२/२००८ चा ठराव,दि.२७/२/२००९ चा ठराव क्र ४९ व ५० दि.२/३/२००९ हे ठराव नमूद केलेले नाहीत.मात्र एकुण विषय सहा होते. दि.३०/४/२००९ ठराव क्रमांक नमूद केलेला नाही. तसेच दिनांक १०/१२/०८ ते २७/२/०९ चे इतिवृत्तान्तावर अध्यक्षांची व सचिवांची स्वाक्षरी झालेली नाही. त्यामुळे प्रोसेडींग बुकातील ठराव हे सुध्दा पुन्हा लिहीलेचे दिसून येते.

मुददा क्रं.१५ :- देवस्थान ऑडीट :-

गेली २ ते ३ वर्षे समितीचे लेखा परिक्षण झालेले नाही. देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांचे लेखापरिक्षण श्री.शेवाळे चार्टट अकौटंट यांनी सन २००४-०५ पर्यंत केले आहे. अहवाल पाहता जमा खर्च पत्रकावर चार्टट अकौटंट यांची स्वाक्षरी नाही. अहवालावर समितीने चर्चा केलेली नाही. श्री.शेवाळे यांना ऑडीट फी बाबत महाराष्ट शासनाचे पत्र क्रं.डीएमसी-१४९३/१६९/३८/का-१६, दिनांक १९/६/१९९६ ने मंजूरी दिली आहे. तसेच वेळोवेळी देवस्थान व्यवस्थापन समितीने प्रवास खर्च रक्कम आदा केली अगर कसे ? याबाबत समजून येत नाही. अहवाल समितीसमोर ठेवणेस मंजूरी घेतलेली नाही.

मुददा क्रं.१५-अ :- टेंबलाई परिसर, लक्ष्मीपूरी व बागल चौक या देवस्थानच्या जागेवर बांधा व वापरा बाबत भूखंड विकसीत न केलेबाबत-

त्र्यंबोली परिसर विकासाचे काम रक्कम रु २,३२,९६,३४९/- चा विकास आराखडा मंजूर केला असून या बजेटपैकी एक चतुर्थांश रक्कम रु ५८,५४,०८८/- देवस्थान समितीने कोल्हापूर महानगरपालिकेकडे भरणा करणे आवश्यक होते. सदरची रक्कम दिनांक ११/१२/०८ रोजी कोल्हापूर महानगरपालिकेस जमा केली असून सदर विकास आराखडेअंतर्गत कम्पौंड वॉल, ड्रेनेज, रस्ता, पार्कींग, धर्मशाळा, एमपी थिएटर, टॉयलेट, लॅन्डस्केप इ.विकास कामे चालू आहेत. सदर काम कोल्हापूर महानगरपालिकेचे मार्फत चालू आहेत.

मुददा क्रं.१५-ब :- देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर या मुख्य कार्यालयाचे श्री.क्षेत्र त्र्यंबोली येथे बांधकाम करणेबाबत -

कसबा करवीर रि.स.नं.३३८ क्षेत्र ७ हे.०.६७ आर जागेत एकूण ९०४.७५ चौ.मी. जागेत मुख्य कार्यालय इमारत बांधकामाचे प्लॅन इस्टीमेट तयार केले आहेत व त्याप्रमाणे कोल्हापूर महानगरपालिकेची बांधकामे परवानगी मागणी करण्याची संचिका पाहता दिसून येते. अद्याप बांधकाम परवानगी प्राप्त झालेची दिसून येत नाही. याबाबत संबंधीत अभियंता



"अस्सल प्रमाणे नक्कल खरी आहे."
उप सचिव, विधि व न्याय विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

उल्लेख नाही. यावरुन फक्त लाभार्थीचे हीत विश्वस्तांनी पाहिल्याचे दिसून येते. देवस्थानची शेतजमीन अकृषिक कारणासाठी कोणाच्याही परवानगी शिवाय दिलेचे दिसून येते. म्हणजे समितीने शर्तभंग केलेचे प्रथम दर्शनी दिसून येते.

मुददा क्रं.१७:-श्री.महालक्ष्मी मंदीरामार्फत विक्रीस ठेवणेत आलेल्या लाडूच्या निविदा बाबत

बुंदीकळी लाडू निविदा प्रक्रीया:-

जाहीर प्रसिध्दी :- २०/१२/२००८

अंतिम दिनांक :- २४/१२/२००८

उघडलेचा दिनांक :- २६/१२/२००८

तुलनात्मक तक्त्यानुसार प्राप्त निविदा :-

| | माल मजूरी (शेकडा) | पैकी मजुरी (शेकडा) |
|---|---|---|
| १) श्री.एस.पी.अन्वर | ४५० | २०० |
| २) श्री.निशांक हराळे | ३८५ | ७० |
| ३) श्री.प्रदीप मिसाळ | ८५० | १२५ |
| ४) श्री.संजय करजगार | ५३० | ४२५ |
| ५) श्री.विजय करजगार | ४०० | १२५ |

तुलनात्मक तक्त्यानुसार श्री.हराळे यांचे दर सर्वात कमी असूनसुध्दा संबंधीताने मंजूर केलेले नाहीत. तक्त्यानुसार कोणत्याही उपस्थितांच्या सदस्य, अध्यक्ष, सचिव, लेखापाल यांच्या स्वाक्ष-या नाहीत. लाडू बनविणेचा ठेका देवून नियम बाहयता केली आहे. पुरवठा आदेश दिलेले नाहीत. मुंबई पब्लिक ॲक्ट, १९५० नुसार केलेल्या नियमानुसार समितीस निविदा मंजूर करताना फक्त रु५,०००/- च्या मर्यादा दिलेल्या आहेत. त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या निविदांचे कामकाजाबाबत शासनाची पूर्व परवानगी घेवून निविदा मागविणे आवश्यक होते. परंतू अशी पध्दत अवलंबलेली नाही सर्व नियमबाहय आहे.

श्री.करजगार यांना दिनांक २४/४/२००९ रोजी पत्र क्रं.देवस्थान/वशि/ज-२०४६/२००९ नुसार रदद केलेला आहे. श्री.विजय करजगार यांचा करार लिहून घेणार यांनी स्वाक्षरी केलेली नाही. तसेच लाडूचे नमूने प्रयोगशाळेतून तपासून त्यातील घटकांचे प्रमाणाचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

यानंतर दिनांक २४/४/२००९ चे पत्रानुसार दिनांक १/५/२००९ पासून श्री.मिसाळ यांना लाडू पुरवठा करणेबाबत कळविले आहे. परंतू पुरवठा आदेश दिलेला नाही. करार केलेला आहे. परंतू लाडूचा नमुना प्रयोगशाळेतून तपासून घेतलेला नाही.

सबब शासनाची पूर्व परवानगी घेवून निविदा मागविणे आवश्यक होते. परंतू अशी पध्दत अवलंबलेली नाही सर्व नियमबाहय आहे.

**मुददा क्रं.१८ :- श्री.महालक्ष्मी मंदीरातील दानपेटी व दागिनेबाबत :-**

श्री.महालक्ष्मी मंदीरातील दानपेटी व दागिने नोंदीचे रजिस्टर पहाता मुंबई पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० मधील ३६-ब मधील ४ ते ६ मध्ये सूचित केलेप्रमाणे दानपेटी

दागिन्याचे रजिस्टर स्वतंत्र ठेवले आहे. परंतू त्यामध्ये दागिन्याच्या नोंदी या रजिस्टरमध्ये दागिन्याचे प्रकार व वजन आणि होणारी किंमत याबाबतच्या नोंदी केलेच्या दिसून येत नाहीत. ज्या नोंदी केल्या आहेत त्या मोघम स्वरुपाच्या व अंदाजे किंमतीच्या नोंदी केल्या आहेत. या रजिस्टर तपासणी ही ते ज्या देवालयाचे ट्रस्टी असतील त्यांनी ती पेटी तपासून तपासले ते बरोबर आहे असा शेरा ठेवून स्वाक्षरी करणेची आहे. असा प्रकार ट्रस्टी यांनी केलेचा दिसून येत नाही. बीपीटी कायदा १९५० नुसार ३६-ब मधील ३ प्रमाणे वर्षातून दर तीन महिन्यांनी तपासणी करुन शेरा तपासणी बाबतचा ठेवणेचा आदेश आहे. याबाबत अशा प्रकारची तपासणी केलेली नाही. वरील दागिन्यांबाबत रजिस्टर नोंदीचे ऑडीट झालेले नाही.

दानपेटीचे रजिस्टर हे दि.११/११/२००८ पासून २३/१२/२००९ अखेर लिहीले आहे. त्यामध्ये सी.एन.पाठक हे व्हॅल्यूएटर म्हणून काम पहात होते ते करवीर निवासिनी व केदारलिंग या देवाकडे मौल्यवान दागिन्यांचे मुल्यांकन करण्यासाठी सराफ म्हणून नेमणूक केली होती. ते दिनांक ५/७/२००९ रोजी मयत झालेने त्यांचे ठिकाणी नेमणूक व्हावी म्हणून श्री.यु.सी.पाठक यांनी दिनांक ६/८/२००९ रोजी अर्ज दिलेला आहे. परंतू त्यांचे नियुक्ती बाबत अदयाप विचार झालेला नाही. त्यामुळे दिनांक ६/७/२००९ पासून ८/१/२०१० पर्यंत मौल्यवान दागिन्यांचे मुल्यांकन झालेले नाही. त्यांचे मुल्यांकन सदर समितीने अंदाजे रजिस्टरवरती नोंद केलेचे दिसून येते.

**मुददा क्रं.१८ :- ऑम्बॅसिटर कारचे लॉगबूक :-**

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडील समितीचा कारभार पहाणेसाठी एक ॲम्बॅसिडर कार व एक बोलेरो जीप अशी दोन वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. ॲम्बॅसिडर कार मा.अध्यक्षांच्या बापरासाठी आहे व बोलेरो जीप सचिव यांच्यासाठी ठेवणेत आलेली आहे. लॉगबुकाचे नोंदी व्यवस्थित नाहीत.

**मुददा क्रं.१९ :- श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी, कोल्हापूर यांचेकडील पावत्या व सोन्याचे रजिस्टर तपासणी :-**

श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी कोल्हापूर यांचेकडील पावत्या व सोन्याचे रजिस्टर तपासले असता पावत्यांनी जमा झालेले सोन्याचे दागिने, जिन्नस वस्तू सोन्याचे रजिस्टरला नोंद नसलेचे दिसून आले.

वरील प्रमाणें तक्रार अर्जातील मुददेवर चौकशी व तपासणी करुन मुददेवार खुलासा करणेत आला आहे. या चौकशीवरुन देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांनी देवस्थान कार्यालयातील केलेला कारभार पहाता हा शासनाचे मंजूरीने करणे वाजवी होते तसे न करता कार्यवाही करुन कार्योत्तर मंजूरी मागणी केलेचे दिसून येते ही बाब अयोग्य असून नियमबाहय आहे. त्याकरिता सदर कार्यालयाचा कार्यभार हा सुरळीत चालवणेच्या दष्टिकोनातून शासनाकडील महसूल वर्ग-१ किंवा वर्ग-२ या शासकीय अधिका-याची प्रशासकीय म्हणून आणि वित्तीय व्यवस्थापनेसाठी लेखाधिकारी यांची नियुक्ती होणे आवश्यक

लेखापरीक्षण अहवाल २००४-०७ परिशिष्ट ५

"VENUS", Block No. C-602, Building No.12,
BHAKTI PARK, Sion – Wadala Link Road,
Anik – Wadala ( East ), Mumbai.
Mobile : 9224431303

B S SHEWALE & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS
Shiva E Numh, Block No. 1, Plot No. 205 A
Dr. Annie Besant Road, Worli
Mumbai – 400 018

# श्री. केदारलिंग देवस्थान
## वाडी रत्नागिरी

### साहित्याची प्रत्यक्ष तपासणी व कार्यालयामधील तपासलेले रेकॉर्डबाबत शेरे

१) **मदत पेटीमध्ये मिळालेल्या वस्तू :-**

काही वेळा मदत पेटीमध्ये सोन्याचा व इत्यादी वस्तू देवास अर्पण केलेल्या असतात. अशा वस्तूंची ओळख. पटत नाही कारण सोन्याचा तुकडा, सोन्याची गोळी असे त्यांचे स्वरुप असते. अशा लहान सहान वस्तू स्वतंत्रपणे ठवण्याऐवजी त्या एकत्र करून सोन्याचा एखादा ओळख पटेल असा दागदागिना करावा असे आम्हास सुचवावेसे वाटते कारण सोन्याचा तुकडा, चांदीचा पत्रा, सोन्यांची गोळी अशा ओळख न पटणाऱ्या वस्तू ठेवण्यापेक्षा त्या ऐवजी ज्यांची ओळख पटेल अशा वस्तूंमध्ये रूपांतर करणे नियंत्रणाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| ८७२ | सोने | ५५५ १९१०८० | मदतपेटी मध्ये मिळाली | ५०० मि.ली. |
| ११०० | सोन्याची गोळी | - | मदतपेटी मध्ये मिळाली | ५ ग्रॅम |

२) **सोन्याच्या वस्तू :-**

सोन्याच्या जिन्नसांना प्लॅस्टिक पिशवीत स्वतंत्रपणे ठेवून त्याप्रमाणे अनुक्रमांक व तपशिल दर्शविणारे लेबल तसेच अधिकृत गोल्ड व्हॅल्युअरचा दाखला असणे जरूरीचे आहे. सध्या विशिष्ट अनुक्रमांकाची वस्तू ही प्रत्यक्षात तीच आहे, याबाबत जामदार जे सांगतात तेच योग्य आहे असे मानन्या

व्यतिरिक्त पर्याय नाही. म्हणून प्रत्येक सोन्याची वस्तू स्वतंत्रपणे ओळखता येईल अशा पद्धतीने सोन्याच्या वस्तू ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| १२८५ | सोन्याचा हार (पाकळयाचा) | ४३९०२ | २३/७/२००० | १० ग्रॅम |

३) **चांदीच्या वस्तू :-**

चांदींच्या वस्तूंना जरी अनुक्रमांक दिलेले असले तरी त्या अनुक्रमांकाने उल्लेख केलेली वस्तू तीच आहे, याबाबत खात्रीलायक खुलासा मिळत नाही. याकरिता अशा चांदीच्या वस्तूंवर शक्यतो अनुक्रमांक कोरणे हाच योग्य मार्ग वाटतो. मात्र वस्तू लहान असेल व त्यावर अनुक्रमांक कोरणे सहज शक्य नसेल तर अशा बाबतीत ती चांदीची वस्तू प्लॅस्टिक पिशवीत ठेवून त्या वस्तूंची माहीती व अनूक्रमांक असलेले लेबल त्याच प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवण्यात यावे.

उदाहरणादाखल :-

आम्ही खालील चांदीच्या वस्तूंच्या वस्तू तपासल्या. तथापि जामदारांनी दाखवलेली वस्तू हीच त्या अनुक्रमाने उल्लेखलेली वस्तू आहे असे निश्चितपणे मानता येईल असा कागदोपत्री पुरावा मिळत नाही.

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| १२८४ | चांदीचे लींग | ४१४०८ | २२/५/२००० | २० ग्रॅम |
| १२८६ | चांदीचा कळस | ४६७१३ | १३/८/२००० | २५० ग्रॅम |
| १२८८ | ताट (घंगाळ) | २८२२४ | २६/९/२००० | १ किलो ७३३ ग्रॅम |
| १२८८ | घोडा | २८९१२ | २/१०/२००० | २० ग्रॅम |
| १२९० | चांदीची थाळी, | १२१२ | ८/११/२००० | १७५ ग्रॅम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पंचपाळ, पळी | | | |
| १२९२ | लहान पावले | २५०१ | १०/१२/२००० | २० ग्रॅम |
| १२९६ | लहान पाळना | ६८०२ | २८/०३/२००१ | १५ ग्रॅम |

४) **वजन नमुद न केलेल्या वस्तू :-**

सोन्याच्या व चांदीच्या वस्तूंचे जे रेकॉर्ड ठेवलेले आहे, त्यामध्ये काही वेळा वजन (माप) हा कॉलम भरलेला नाही. त्यामुळे ती वस्तू किती वजनाची आहे, तसेच त्या अनुक्रमाणे उल्लेखलेली वस्तू तीच आहे याचा कोणताही खात्रीलायक पुरावा उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रत्येक मौल्यवान वस्तूचे गोल्ड व्हॅल्युअरकडून दाखले घेउन वजन इत्यादी तपशिल भरून रेकॉर्ड अद्यावत करणे जरूरीचे आहे.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| ८५४ | चांदीचा घोडा | ८४८ | १५/४/१९७९ | - |
| ८६६ | सोन्याचे मणी मंगळसुत्र | १४५८ | ३०/३/१९८० | - |
| ८६७ | चांदीची जोडवी व विरूद्या जोड | १४५८ | ३०/३/१९८० | - |
| १३०१ | चांदीचा घोडा | १०९१० | १४/४/२००१ | - |

टीप :- अनुक्रमांक १३०१ या वस्तूंची पूर्ण चांदी नसल्याने त्याचा तपशिल लिहलेला नाही असे सांगण्यात आले.

५) **अनुक्रमांक सलग नसणे :-**

प्रत्येक मौल्यवान वस्तूला विशिष्ट अनुक्रमांक असणे ही आवश्यक बाब आहे. तथापि अनेकदा एकापेक्षा अधिक वस्तूंना व त्यानी वेगवेगळया दिनांकास उपलब्ध झालेल्या वस्तूंना एकच अनुक्रमांक दोन किंवा अधिक वेळा दिलेला आढळतो. त्यामुळे एकाच अनुक्रमांकांच्या एका पेक्षा जादा वस्तू असू शकतात.

अनुक्रमांक सलगपणे असावेत एवढी साधी गोष्ट ही न पाळल्यामुळे जेवढे अनुक्रमांक आहेत तेवढयाच वस्तू जामदारांच्या ताब्यात आहेत असे मानता येत नाही. तरी या सर्व सोन्या, चांदीच्या वस्तूंचे गोल्ड व्हॅल्युअरकडून तपासणी करून व सलग अनुक्रमांक येतील अशा पद्धतीने प्रत्येक वस्तूंची ओळख पटेल असे खुलासेवर रेकॉर्ड तयार करणे आवश्यक आहे.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| १२८८ | ताट (घंगाळ) | २८२२४ | २६/९/२००० | १ किलो ७३३ ग्रॅम |
| १२८८ | घोडा | ४८९१२ | २/१०/२००० | २० ग्रॅम |
| १२९४ | घोड्याचा छाप असलेला सोन्याचा पत्रा | ३९०५ | ९/१/२००१ | ३ ग्रॅम |
| १२९४ | सोन्याचा नाग | ४००५ | ११/१/२००१ | ५ ग्रॅम |
| ९७७ | चांदीची साखळी मध्ये सोन्याचे लॉकेट | ८९०३ | २६/८/२९८७ | ८ग्रॅम साखळी ४ ग्रॅम लॉकेट |
| ९७७ अ) | चांदीचा घोडा | ९००२ | २/१०/१९८७ | २० ग्रॅम |
| ९७७ ब) | चांदीचा घोडा | ९००४ | ३/१०/१९८७ | १० ग्रॅम |
| ९७७ क) | दृष्टी जोड १ नग | मदत पेटी क्र. २ | १६/१०/१९८७ | ५ ग्रॅम |

## ६) वजना बाबतची खातर जमा :-

काही मौल्यवान वस्तू त्या वजनाच्या नसाव्या अशी प्रथमदर्शी शंका येते. अर्थात याबाबत गोल्ड व्हॅल्युअरचे प्रमाण पत्रच निश्चित वजन किती आहे याचा खुलासा करू शकेल त्यामुळे रेकॉर्डवर वजन किती लिहीलेले आहे यापेक्षा गोल्ड व्हॅल्युअर ते वजन किती आहे असा दाखला देईल त्याच वेळी लिहीलेले रेकॉर्ड यथायोग्य असल्याची खातरजमा होउ शकेल.

B. S. SHEWALE & ASSOCIATES

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|
| ९४६ | सोन्याचा गोफ | ६४९२ | १७/४/१९८६ | १३८ ग्रॅम |

७) **खराब अथवा तुटलेल्या वस्तू :-**

चांदी अथवा सोने यांच्या मौल्यवान वस्तूंपैकी काही खराब अथवा तुटलेल्या आहेत. अशा अनेक वस्तू जमादारखान्यात असल्याने साकल्यांने विचार करूनच अशा तुटलेल्या अथवा बाद वस्तूंबाबत समितीने निर्णय घ्यावा.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू |
|---|---|
| ३६/२७० | सोन्याचा गोफ |

वस्तूवर चौकोनी लेबल आहे त्यावर (३११.११) ३३६रू लिहीलेले आहे.

८) **रेकॉर्ड मधील तफावती :-**

रजिस्टरप्रमाणे अनुक्रमांक १०२७ व्हौचर नंबर १५६३६ प्रमाणे दिनांक १५/४/१९९० रोजी चांदीचा घोडा दिसत आहे. मात्र प्रत्यक्ष वस्तू पाहीली तेव्हा १०२७ अनुक्रमांकास सोन्याची मोहन माळ मिळाली यावरून सर्व मौल्यवान वस्तूंचे संपूर्ण तपासणी करून अद्यावत रेकॉर्ड ठेवणे किती जरूरीचे आहे, याची कल्पना येईल.

उदाहरणादाखल :-

| | अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (माप) |
|---|---|---|---|---|---|
| रजिस्टर | १०२७ | चांदीचा | १५६३६ | १५/४/१९९० | १ ग्रॅम |

B. S. SHEWALE & ASSOCIATES

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रमाणे वस्तू बघितली तेव्हा | १०२७ | घोडा सोन्याची मोहन माळ मिळाली | - | - | - |

९) **सोन्याची शुद्धता :-**

रेकॉर्डवर सोन्याच्या वस्तू असे नमुद केले असले तरी प्रत्यक्षात ती वस्तू पाहील्यावर ती वस्तू शुद्ध सोन्याची आहे किंवा त्यात काही भेसळ आहे अशी शंका येते त्यामुळे गोल्ड व्हॅल्युअर कडून दा्गिण्यांची तपासणी करून घेताना ते दागिने किती कॅरेट सोन्याचे आहेत म्हणजेच किती शुद्ध सोन्याचे आहेत याचा तपशिल घेणे जरूरीचे वाटते.

उदाहरणादाखल :-

| अनुक्रमांक | वस्तू | हौचर क्र. | दिनांक | वजन (मापं) |
|---|---|---|---|---|
| ११९७ | सोन्याची साखळी | १४७०५ | ८/५/१९९४ | १८ ग्रॅम |

सदर वस्तू काळी पडली आहे.

१०) **मौल्यवान वस्तूंचे रेकॉर्ड :-**

लेखापरिक्षण करत असताना आमच्या निर्दशनास आले की, या मौल्यवान वस्तूंची माहीती तीन रेकॉर्डमध्ये (जाप्तेबुक) नोंदलेली आहे. 'अ,ब,क' हे रेकॉर्ड वर्षानुवर्ष वापरात असल्याने जिर्ण झालेले आहेत या रेकॉर्डची एखादी जादा प्रत समिती कार्यालयात अथवा अन्यता कोठेही नाही असे सांगण्यात आले. दुर्देवाने हे रेकॉर्ड अधिक जिर्ण अथवा गहाळ झाले तर या मौल्यवान वस्तूंचा तपशिल दर्शविणारी माहीती कोठेही नाही. यामुळे या तीन्ही रेकॉर्डची जादा प्रत (कॉपी) काढण्यात यावी व अशा मौल्यवान वस्तूंची जादा प्रत शक्यतो बॅंक लॉकर सारख्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावी. अनुक्रमांक ८१७ च्या आतेदरचे रजिस्टर मुख्य कार्यालयात नेले आहे, असे आम्हास सांगण्यात आले.

B. S. SHEWALE & ASSOCIATES

अ) मौल्यवान जिन्नसांचे जाप्तेबुक

श्री केदारलिंग वाडी रत्नागिरी देवस्थान कडील सन १९६६ ते १९७५ इत्यादी पासून 'नगदी ए'

ब) मौल्यवान जिन्नसांचे जाप्तेबुक

श्री केदारलिंग वाडी रत्नागिरी देवस्थान कडील सन १९७५ ते १९७६ पासूनचे

क) सोन्या चांदीच्या जिन्नसाचे पत्रक

श्री केदारलिंग वाडी रत्नागिरी येथिल 'ए'

ट्रेझरीत ठेवणे जिन्नसांचे पत्रक नं. २

११) **नित्यनैमित्तिक साहित्याचे स्टॉक बुक :-**

देवस्थानाकडे नित्यनैमित्तिक खर्चास लागणारे जिन्नस जमाखर्च बद्दल जे स्टॉक बुक ठेवलेले आहे, त्याचे परिक्षण केले असता, असे निदर्शनास येते की, सुपारी, कुंकू इत्यादी वस्तू सामान्यत: दरमहा जेवढ्या आवश्यक असतात तेवढ्याच खरेदी केल्या जातात. तसेच उंट व घोड्याकरीता लागणारे भुसा व हरभरे यांचीही मासिक गरजेप्रमाणे खरेदी केली जाते. त्यामुळे सामान्यत: महिना अखेरीस शिल्लक माल दिसत नाही. मात्र भक्तजनांनी दिलेला गुळ, शेंगा इत्यादी साहित्य शिल्लक राहू शकते.

१२) **परवाना बुक :-**

नित्य खर्चास लागणाऱ्या साहित्याचे परवाना बुक उप कार्यालय वाडी रत्नागिरी यांनी ठेवले असून त्यांनी मासिक पद्धतीने दरमहा जेवढी गरज असेल त्याप्रमाणे त्या वस्तुंची खरेदी करण्याकरिता वस्तुनिहाय विवरण केले जाते व स्थानिक खरेदी व कोल्हापूर येथील करावयाच्या खरेदीला पूर्व मंजूरी घेतली जाते. सामान्यत: स्थानिक खरेदी फक्त नाशवंत इत्यादी वस्तूंची केली जाते. या परवाना बुकामध्ये शिल्लक मालाचाही तपशिल असतो, तसेच यात्रेकरता लागणाऱ्या साहित्याचा तपशिल नमूद करुन त्यांना मान्यता घेतली जाते.

B. S. SHEWALE & ASSOCIATES

१३) जनावरांचे जाप्ते बुक :-

"श्री केदारलिंग देवस्थान" वाडी रत्नागिरी, जोतिबा यांच्या कार्यालयामध्ये असणाऱ्या जनावरांचे जाप्ते बुकाचे परिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, देवाचा पांढरा घोडा दि. १४/०२/८५ रोजी बंडू हूसेन कुरणे यांच्याकडून रु. १२,००१/- ने खरेदी केला सध्या त्याचे वय ३२ वर्ष आहे व दीड वर्षापूर्वी कोल्हापूरचे पत्रावळे यांनी एक नविन घोडा देणगी म्हणून दिला ते प्रत्यक्ष तपासणी करताना घोडयाचे रखवालदार श्री अशोक शंकर भोसले यांच्याकडे यथायोग्य आढळले.

दि. १४/०९/१९९९ ला उंट ( कोकाकोला रंगाची मादी ) रु. ७,५०१/- ला खरेदी केली. तथापि, अपेक्षित पद्धतीने उंटाचे वर्तन नसल्याने मादी परत करुन दि. २४/०२/२००२ रोजी उर्वरित किंमत रु. १४,०००/- स पांढरा नर उंट खरेदी केला, प्रत्यक्ष तपासणीच्या वेळेला श्री. भिमराव गणपती कचरे याचे ताब्यात आहे.

दि. २० जुन २००७ रोजी हत्ती वारणा समुह यांच्याकडून देणगी म्हणून मिळाला आहे. तो सात वर्षाचा आहे ते प्रत्यक्ष तपासणी करताना हत्तीचे रखवालदार श्री जामिर शेख यांच्याकडे यथायोग्य असल्याचे अढळले.

उंटासाठी दररोज ५०० ग्रॅम हरभरे, ४ किलो भुसा, गवत ५० पेंढी, घोड्यांसाठी दररोज १ किलो ५०० ग्रॅम हरभरे, २ किलो भुसा, ५० पेंढी गवत व हत्तीसाठी १०० पेढीं गवत व ५ किलो भुसा असा आहार आहे. गवत देवस्थानाच्या कुरणातून उपलब्ध होते.

१४) कर्मचारी :-

श्री. एन. एम. विंचू यांच्याकडे ऑफिस चार्ज असून श्री. जयवंत वसंत जामदार यांच्याकडे रोकड, सोने, चांदी, मौल्यवान वस्तू, कपडे यांचा चार्ज आहे.

श्री. केदारलिंग देवाचे वाहन घोडा आहे. ज्यामुळे देवाच्या घोड्याची देखभाल यथायोग्यरित्या व्हावी म्हणून अशोक उर्फ राजाराम शंकर भोसले यांची मोतद्दार म्हणून नियुक्ती केली आहे व त्यांना स्केलप्रमाणे पगार दिला

जातो. देवाच्या उंटाची देखभालही योग्यरित्या व्हावी म्हणून श्री. भिमराव गणपती कचरे यांची कामाठी म्हणून नियुक्ती करुन त्यांनाही स्केलप्रमाणे पगार दिला जातो. त्याचप्रमाणे देवासाठी एक हत्ती देणगी म्हणून मिळाला आहे. त्याच्या देखभालीसाठी जामिर शेख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. देवस्थानाकडे एकूण कर्मचारी ४४ आहेत त्यापैकी २७ कर्मचारी स्केलप्रमाणे आसून त्यांची यादी उपलब्ध झाली आहे.

१५) **श्रीकडील पायरीवर मारले रुपयाचे रजिस्टर :-**

पायरीवर मारलेल्या रजिस्टरप्रमाणे दि. ११/०४/२००३ रोजी ७/- रुपये मारलेले होते. दि. २८/०१/२००६ पर्यत रु. ४/- ने भर पडली त्यामुळे अहवाल दिनांकापर्यत पायरीवर मारलेले रु. ११/- असल्याचे दिसते.

१६) **श्री. केदारलिंग देवस्थानाचे उत्पन्न :-**

श्री. केदारलिंग देवस्थानांच्या मालकीच्या जमिनी तसेच भक्तांची दरवर्षी वाढणारी संख्या यांचा विचार करता, सध्याचे उत्पन्न अत्यल्प असल्याचे दिसते. खंड, वतनपट्टी, दुमाला रसद बरीच थकीत असून वसूलीचे अधिकाराबाबत संदिग्धता असल्याने येणे बाक्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत.

१७) **नुतन धर्मशाळा व दुकाने यांचे बांधकाम :-**

नुतन धर्मशाळा व दुकाने यांचे बांधकाम प्रत्यक्ष तपासणीच्या वेळी पाहण्यास मात्र दुकान विक्री अथवा अन्य कोणतेही उत्पन्न झालेले नाही. तसेच बांधकामाचे पेमेंटही झालेले नाही असे सांगण्यांत आले आहे.

१८) **मौल्यवान जिन्नसांचे मुल्यांकन रिपोर्ट नसणे :-**

समितीच्या ठरान्वये समिती नियुक्त सरकारमान्य व्हॅल्यूअर यांनी करवीर निवासिनी, जोतिबा व अन्य देवस्थाने यांचेकडील मौल्यवान वस्तूंचे मुल्यांकन करून सर्व तपशिल दर्शविणारे रजिस्टर ठेवावयाचे आहे. मात्र केदारलिंग देवस्थानातील एकाही मौल्यवान वस्तूंचे मूल्यांकन व्हॅल्युअर यांनी केलेले नाही. मौल्यवान वस्तूंचा दर्जा व बाजारमुल्याप्रमाणे होणारे मुल्यांकन तज्ञ व अधिकृत व्यक्तीकडून तपासले जावे आणि त्यांनी ठेवलेले रजिस्टर व

देवस्थानने ठेवलेले जाप्ते बुक यामध्ये समन्वय असावा या उद्देशाने व्हॅल्युअर यांची नियुक्ती केलेली आहे जर नियुक्ती होउनही व्हॅल्युअर आवश्यक ते व्हॅल्युएशन रिपोर्ट सादर करीत नसतील तर व्हॅल्युएशनशी संपर्क साधून मुल्यांकन होण्याविषयी प्रयत्न करावे अन्यथा व्हॅल्युअरच्या नियुक्तीचा फेरविचार व्हावा. आजमितीस शासकिय लेखापरिक्षक आपल्या लेखापरिक्षण अहवालात सोने तपासणीबाबत संपूर्ण शेरे देउ शकत नाहीत. Third party evidence या दृष्टीने मुल्यांकन रिपोर्टचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे मुल्यांकन रिपोर्टला दुसरा कोणताही अन्य पर्याय असू शकत नाही. आम्ही केलेली मौल्यवान जिन्नसांची प्रत्यक्ष तपासणी या गंभीर लेखादोषाला पात्र ठेउन आहे याची नोंद घ्यावी व सर्व दागिन्यांचे व्हॅल्युएशन रिपोर्ट तयार करून ते लेखादोष पूर्तता अहवालासोबत सादर करावेत.

१९) **मदत पेटीतील जिन्नसाचा जाप्तेबुकामध्ये नोंद नसलेल्या बाबी :-**

आमच्या लेखापरिक्षणाच्या वेळी मदत पेटी मध्ये भक्तजनांनी टाकलेल्या काही सोन्याच्या वा चांदीच्या जिन्नसांची नोंद जाप्ते बुकाला झालेली नाही असे निर्दशनास आले. जाप्तेबुकामधे प्रत्येक जिन्नसाची तपशिलासह नोंद असणे आवश्यक आहे. एकादी वस्तू लहान असली तरी तिचाही उल्लेख जाप्तीबुकात असला पाहिजे. कारण जाप्तेबुक हेच देवस्थानाकडील मौल्यवान जिन्नसांचे अधिकृत रेकॉर्ड आहे. त्यामुळे खाली नमुद केलेल्या जिन्नसा जाप्तेबुकात दिसत नाहीत हा अतिशय गंभिर दोष आहे. तरी आजवर भक्तजनाकडून मिळालेल्या सर्व जिन्नसांचा जाप्ते बुकामध्ये नोंद झाल्याचे खातरजमा करावे व लेखादोष दुरूस्ती अहवालासोबत या गंभिर लेखादोषाची पूर्तता कशा प्रकारे केली आहे ते स्पस्ट करावे.

| दिनांक | तपशिल |
|---|---|
| २०/५/१९९४ | सोन्याची लहान अंगठी ८०० मि.ग्रॅम ची |
| ६/८/१९९८ | सोन्याचे लहान तुकडे ७ नग १ ग्रॅम<br>चांदीचा लहान तुकडा १ नग ५०० मिली |

B. S. SHEWALE & ASSOCIATES

| | |
|---|---|
| २९/८/२००० | कानातील झुब्यातील भाग अंदाजे १ ग्रॅम<br>सोन्याचा लहान तुकडा एक<br>सोन्याचा अष्टपैलू लहान मणी एक<br>चांदीचा लहान मणी एक<br>चांदीचे लक्ष्मी व गणपती यांचे चित्र असलेले नाणे १० ग्रॅम<br>चांदीचे ब्रेसलेट २७ ग्रॅम |
| २९/८/२००० | चांदीचे बिस्किट १ नग १० ग्रॅम<br>चांदीचा बंदा रूपाया राजाछाप १० ग्रॅम |
| २७/४/२००४ | सोन्याचे मणी ३, सोन्याची कानातील रिंग लहान १ नग |
| २३/९/२००५ | सोन्याचा लहान बदाम, चादींचा लहान घोडा, एक जोडवे |
| १५/९/२००६ | चादींचे लहान १० घोडे २० ग्रॅम अंदाजे<br>चादींची छल्ला ५ ग्रॅम अंदाजे, चादींची अंगठी ९ ग्रहांची |
| २०/४/२००७ | सोने अंगठी ४ ग्रॅम<br>सोने नाणे लहान १/२ ग्रॅम, चांदीचे लहान २ घोडे १५ ग्रॅम |

२०) **पोस्टेज रजिस्टर** :-

केदारलिंग देवस्थानाकडे विशिष्ट दिवशी अभिषेक करण्याकरीता अभिषेक देणग्या येतात त्या विशिष्ट दिवशी अभिषेक झाल्यानंतर संबधित भक्तजनांना प्रसाद पाठविला जातो. पोस्टेज रजिस्टर मध्ये जमा व खर्च यांचे आकडे एकच असतात म्हणजे जेवढी पोस्टेज तिकिटे खरेदी केली तेवढी सर्व वापरली असे रेकॉर्डवर दिसते. पोस्टेज तिकिटे व प्रसाद पाठविल्याचे रजिस्टर यांचा ताळा घेउन तो लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावा.

२१) **दागिन्यांची दुरुस्ती** :-

आमच्या लेखापरिक्षणाच्यावेळी खालील नमुद केलेले दागिने वापरयोग्य नाही. कारण त्यांना दुरुस्तीची त्वरीत गरज आहे.

१. यमाई देवीची मानकाची माळ एक कडी तुटल्यामुळे त्या माळेची दुरुस्ती त्वरीत व्हावी.
२. बारा पदरी गोफाची कडी तुटली आहे, ती कडी बसवून घ्यावी.
3. जिन्नस नं. ८३६ चांदीचा किरीट याचा लाल मणी गहाळ झाला आहे.
४. त्रिशुळ, डमरु, अमृतपाश व खडग यांना तडे गेले आहेत, त्यामुळे दरुस्त करून घ्यावे.

B. S. Shewale
M A, LL B, F C A



५. केदारलिंग देवाचा सोन्याचा किरीट आहे. परंतू, तो नादुरुस्त आहे. किरीटाच्या एका बाजुला दुरुस्ती केल्याचे दिसते. मात्र दुसऱ्या बाजुस जिथ तडा गेला आहे, त्याची दुरुस्ती झालेली नाही. ती त्वरीत करण्यात यावी व दोष विरहित किरीट वापरला जावो.

२८.१०.२००७

बी. एस्. शेवाळे ॲण्ड असोशिएटस
चार्टर्ड अकौंटंटस

B. S. SHEWALE & ASSOCIATES

चार्टर्ड अकौंटंटस

( बी. एस्. शेवाळे )

बी. एस्. शेवाळे ॲन्ड असोसिएटस्करीता
देवस्थान फंड लेखापरिक्षक

२८.१०.२००७

- कुशिरे तर्फ ठाणे येथील गट क्र. ८१८/१ भागीरथीचे कुरण ह्या १८ हेक्टर ८४ आर मध्ये ३/४ लिलावदार वगळता उर्वरीत जमीन तसेच गट ८८५ मधील २८ हेक्टर ७ आर जमीन वनीकरणामुळे झाडांनी समृध्द झाली आहे.

६५) मुदत संपूनही करारपत्रे न केलेले भुईभाडेधारक :

दोष : आमच्या लेखापरिक्षणाच्या वेळी आम्हास सादर केलेल्या पत्रकावरून असे निर्दशनास येते की सर्व भुईभाडेधारकांची करारपत्रांची मुदत संपलेली आहे व त्यामुळे ते सर्व भुईभाडेधारक अनअधिकृतरित्या जागेचा वापर करत आहेत या लेखादोषाची गंभीरतेने दखल घ्यावी.

| तालूका | भूईभाडे येणे २००७ | भाडेकरू संख्या | करार संपलेल्या भाडेकरूची संख्या |
|---|---|---|---|
| करवीर | १,४२,०७८ | ३४ | ३४ |
| शाहूवाडी | ६८,२०१ | १० | १० |
| हातकणगंले | ३६,५७९ | ५ | ५ |
| चंदगड | १७,४०० | संख्या माहीती नाही | संख्या माहीती नाही |
| भुदरगड | ३९,१३० | ९ | ९ |
| राधानगरी | १३,१०१ | ५ | ५ |
| कागल | १,७९,४५४ | १४ | १४ |
| पन्हाळा | ४४,७३१ | १० | १० |
| गडहिग्लंज | ७७,०२४ | २५ | २५ |
| शिरोळ | ३४,००१ | १ | १ |
| आजरा | ३,०२१ | ३ | ३ |
| वैभववाडी | ४३८ | संख्या माहीती नाही | संख्या माहीती नाही |
| एकूण | ६,५५,१५८ | | |

उपाय : अशा अनअधिकृत भुईभाडेधारकांना नियमित करण्याऐवजी त्यांच्याकडून जमिनी परत घेण्यांची कठोर कारवाई करावी.

B. S. SHEWALE & ASSOCIATES

६६) **श्री. केदारलिंग देवस्थान ब्लॉक भाडे :**

दोष : आमच्या लेखापरिक्षणाच्यावेळी आम्हास सादर केलेल्या ब्लॉक भाडे लिलावदारांच्या पत्रकावरुन खालील स्थिती निदर्शनास येते.

| वर्ष | लिलावदारांची संख्या | लिलावाची एकूण रक्कम |
|---|---|---|
| २००४-२००५ | ५६ | २,८४,९१२ |
| २००५-२००६ | ४८ | १,५१,६०० |
| २००६-२००७ | १९ | २८,६०० |

वरील पत्रकावरुन असे निदर्शनास येते कि, दरवर्षी ब्लॉकभाड्याचे उत्पन्न वाढण्याऐवजी मोठया प्रमाणात कमी होत आहे. कुंपन घातल्यामुळे लिलावदारांची संख्या व लिलावाची रक्कम कमी मिळत असल्याचे सांगण्यात आले.

उपाय : ब्लॉकभाडे उत्पन्न वाढण्यासाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करावी. कारण, ब्लॉक भाडे हे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

६७) **देवस्थान अनपेक्षीत खर्च :**

दोष : आमच्या लेखापरिक्षणाच्यावेळी अनपेक्षित खर्च याबाबत खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली.

| अ. क्र. | कोणत्या कारणासाठी<br>वर्ष २००४-२००५ | रक्कम |
|---|---|---|
| १] | श्री. करवीर निवासिनी देवीच्या साड्या सुनामी आपद्ग्रस्तांना देण्यासाठी शासनाच्या ताब्यात देणेस खाजगी ट्रक्स भाड्याने घेतली. त्याचे भाडे अदा करणेस श्री. शिवदत्त, माणगावे. | ४,००० |
| २] | श्री. करवीर निवासिनीच्या साड्या सुनामी आपाद्ग्रस्तांना देण्याकरिता घेतलेले फोटोच्या बिलाची रक्कम श्री. घेवारी यांना अदा. | १,९०० |
| ३] | श्री. करवीर निवासिनी कडील कायम तसलमात मधून खर्च पडलेली रक्कम व्यवस्थापक यांना अदा | २,२७८ |

S. SHEWALE & ASSOCIATES